महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

File No.:DMER-१६०२३/२/२०२६-EST४ दि:- स्वाक्षरीखाली नमूद

प्रति,
अधिष्ठाता/ अधिक्षक / अधिक्षिका / सहयोगी प्राध्यापक / प्राचार्या,
शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालये सलंग्नित रुग्णालये, आरोग्य पथके, परिचर्या महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

**विषय - गट-क तांत्रिक, अतांत्रिक व परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या करण्याकरीता प्रशासकीय बदलीस पात्र कर्मचाऱ्यांची यादी प्रसिध्द करण्याबाबत....**

**संदर्भ - ०१) बदली अधिनियम - २००५**
**०२) शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दि.०९ एप्रिल २०१८**
**०३) शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दि.२१ नोव्हेंबर २०२२**
**४) संचालनालयाचे समक्रमांकाचे तांत्रिक संवर्गाचे दि.१६/०३/२०२६ व दि.०६/०४/२०२६ रोजीचे परिपत्रक तसेच अतांत्रिक संवर्गाचे दि.२३/०३/२०२६ व परिचर्या विभागाचे दि.२०/०३/२०२६ रोजीचे परिपत्रक**

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भ क्र.४ च्या परिपत्रकान्वये संचालनालयाच्या अधिनस्त संस्थामधील कार्यरत गट-क तांत्रिक, अतांत्रिक व परिचर्या संवर्गातील कर्मचारी यांची प्रशासकीय बदली करीता माहिती सादर करण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. त्यानुसार संचालनालयाच्या अधिनस्त संस्थांनी माहिती सादर केली आहे. संस्थेने सादर केलेल्या माहितीच्या आधारे गट-क तांत्रिक, अतांत्रिक व परिचर्या संवर्गातील बदलीस पात्र कर्मचा-यांच्या याद्या संचालनालयाच्या स्तरावर तयार करण्यात आलेल्या आहेत.

गट-क तांत्रिक, अतांत्रिक व परिचर्या संवर्गातील बदलीस पात्र कर्मचा-यांच्या याद्या या परिपत्रकाव्दारे संचालनालयाच्या www.med-edu.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे, तसेच संस्थेच्या ईमेलवर सदरील याद्या पाठविण्यात येत आहेत. सदरील याद्या संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणाव्यात. प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीवर खालील नमूद बाबींच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

१. प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीवर कर्मचा-यांचे काही आक्षेप असल्यास तसे लेखी निवेदन कर्मचा-यांकडून प्राप्त करुन ते संचालनालयास अधिष्ठाता यांचे मार्फत सादर करावे.

२. यादीतील कर्मचा-यांच्या बाबतीत ते दुर्धर आजाराने ग्रस्त असल्यास (उदा. हृदय शस्त्रक्रिया (बायपास सर्जरी), पक्षघात, कॅन्सर, डायलेसीस) अशा कर्मचाऱ्यांच्या अभिप्राय या कॉलम मध्ये नमूद करावे व त्याबाबतचे पुराव्यांचे दस्ताऐवज अधिष्ठातांमार्फत संचालनालयास सादर करावेत.

३. प्रसिध्द करण्यात येणा-या यादीतील कर्मचारी दिर्घकाळ गैरहजर, निलंबित असल्यास अभिप्राय या कॉलम मध्ये तसे स्पष्ट नमूद करावे.

४. मयत कर्मचा-याचे नाव यादीमध्ये नमूद नसल्याची खातरजमा करावी.

५. कर्मचारी परितक्त्या, विधूर, दिव्यांग तसेच पती-पत्नी एकत्रीकरण धोरणांअतर्गत येत असल्यास अभिप्राय या कॉलम मध्ये स्पष्ट नमूद करावे.

६. प्रसिध्द करण्यात येत असलेल्या यादीमध्ये कर्मचाऱ्यांचा संस्थेतील पदावर नियुक्ती दिनांक, कार्यरत कालावधी, सेवा निवृत्तीचा दिनांक, नावामध्ये तफावत तसेच इतर काही दुरुस्ती असल्यास तसे अधिष्ठाता यांचे मार्फत संचालनालयास सादर करावे.

**वरील नमूद मुद्यांची अचूक माहिती दि.०७/०५/२०२६ रोजी पर्यंत तांत्रिक संवर्गाची “फ” कार्यासनाच्या** fbranchdmer@gmail.com **या ईमेल वर अतांत्रिक संवर्गाची** dbranchdmer@gmail.com **तसेच परिचर्या संवर्गाची** ebranchdmer@gmail.com **या ईमेलवर सादर करावी.**

याबाबत असेही नमूद करण्यात येते की, गट-क संवर्गातील कर्मचा-यांच्या प्रशासकीय बदल्यांची कार्यवाही संस्थांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे करण्यात येत आहे. त्यामुळे माहिती सादर करतांना अत्यंत काळजीपुर्वक सादर करावी. याबाबत संस्थेकडून कोणतीही चुकीची माहिती सादर झाल्यास व त्यामुळे न्यायालयीन प्रकरणी उद्भवल्यास संस्थेतील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात येऊन आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल,यादी नोंद घ्यावी.

Digitally signed by
ANIL BHANDARI
Date: 04-05-2026
11:14:47

**आयुक्त**

**वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष**